# व्यावसायिक एलपीजीचा कर कमी करण्याची मागणी

मुंबई, ता. २८ : ग्राहकांना कमी किमतीत अन्नपदार्थ देणे शक्य व्हावे यासाठी व्यावसायिक एलपीजी सिलिंडरवरील जीएसटी कमी करावा, अशी मागणी हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियातर्फे करण्यात आली आहे. या सिलिंडरवरील जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्के करण्याची विनंती असोसिएशनने पंतप्रधानांना पत्राद्वारे केली.

हॉटेल रेस्टॉरंट उद्योगासाठी एलपीजी सिलिंडर ही अत्यावश्यक बाब आहेत. त्याच्या किमतीत प्रचंड वाढ झाल्याने रेस्टॉरंटमध्ये विकल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांच्या किमती वाढतील. विशेषत: छोट्या रेस्टॉरंटला याचा अधिक फटका बसेल. घराबाहेर एकटे राहणाऱ्यांना या छोट्या रेस्टॉरंटमध्ये जेवण मिळते. त्यामुळे निदान त्यांच्यासाठी तरी सिलिंडरवरील जीएसटी कर कमी व्हावा, अशी असोसिएशनची मागणी आहे. गेल्या दोन वर्षांत एलपीजीच्या किमतीत चारशे ते पाचशे रुपये वाढ झाली आहे. त्याचबरोबर डिझेल आणि पेट्रोलच्या दरांमध्ये सातत्याने वाढ होत असल्यामुळे वाहतुकीच्या खर्चातही वाढ होत आहे. यामुळे धान्य, डाळी आणि इतर अनेक जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीही वाढल्या आहेत. त्यातच छोट्या रेस्टॉरंटना इनपुट टॅक्स क्रेडिटमध्ये सवलत मिळत नसल्याने त्यांच्यावरील कराचा बोजा वाढतो व त्यामुळे जेवणाची किंमत वाढते, असेही असोसिएशनने दाखवून दिले आहे.